# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

केंद्र शासन पुरस्कृत, "उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम" (ULLAS Navbharat Saksharata Karykram) सन २०२२-२३ ते सन २०२६-२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या या कार्यक्रमाचा हेतू देशातील 15 वर्ष आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसीत करून देशातील 15 वर्ष आणि त्यावरील वयोगटातील असाक्षर व्यक्तींना महत्वपूर्ण जीवन कौशल्ये विकसीत करावयाची आहेत. या कौशल्यांमध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरूकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण, इ. बाबींचा समावेश आहे. स्थानिक रोजगार, पुनर्कुशलता आणि उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या दृष्टीकोनातून प्रौढ नव - साक्षरांसाठी निरंतर शिकण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून देशातील 15 वर्षे आणि त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसीत करता येतील त्याची अंमलबजावणी केंद्र आणि राज्य / केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संबंधित मंत्रालये / विभागांच्या सहाय्याने केली जात आहे. महाराष्ट्र राज्याने दि. १४/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे हा कार्यक्रम स्वीकारला आहे. त्यानुसार २५/०१/२०२३ च्या शासन निर्णयानुसार या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय जिल्हास्तरीय, गटस्तरीय, शाळास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमात शाळा हे एकक आहे.

त्यास अनूसरून मिरा भाईंदर शहरात नोंदणी केलेल्या 70 केंद्रांमध्ये (शाळांमध्ये) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (FLNAT) परीक्षा रविवार, दि. 23.03.2025 रोजी होणार आहे. मिरा भाईंदर शहरातील एकूण 1052 परीक्षार्थ्यांनी या परीक्षेकरीता नोंदणी केली आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना NIOS (National Institute Of Open Schooling) म्हणजेच राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्थानकडून उत्तीर्ण प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

- **परीक्षार्थ्यांकरीता महत्त्वपूर्ण सूचना –**

    - परीक्षेची वेळ सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत असेल. प्रत्यक्ष पेपरचा कालावधी 3 तासांचा असेल. (दिव्यांग व्यक्तींसाठी 30 मिनिटे जादा वेळ) परीक्षार्थी सदर परीक्षेसाठी वरील कालावधीत कधीही येऊ शकेल.
    - उपस्थित परीक्षार्थीना प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका एकत्रित असेलेला पेपर मिळेल.
    - परीक्षेचे माध्यम मराठी माध्यमातून परीक्षा आयोजित करणेत येईल. अपवादात्मक परीक्षा केंद्रांवर इतर माध्यमांचे परीक्षार्थी आल्यास त्याबाबतची जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (योजना) यांचेकडून करण्यात येत आहे,
    - उत्तरपत्रिकेतील माहिती व उत्तरे लिहिण्यासाठी फक्त काळ्या किंवा निळ्या शाईचा पेन वापरावा. पेन्सिल अथवा इतर रंगाची शाई असलेला पेन वापरु नये.
    - यु-डायस क्रमांकानुसार असाक्षरांची नोंदणी केलेली प्रत्येक शाळा ही परीक्षा केंद्र असेल.
    - परीक्षेसाठी उल्लास ॲपवरील नोंदणीकृत असाक्षर व्यक्तीच परीक्षा देण्यास पात्र असेल. उल्लास ॲप वर ऑनलाईन नोंदणी केलेली नसल्यास परीक्षा देता येणार नाही.

- **या कार्यक्रमाविषयी अधिक माहिती**

FLNAT परीक्षा देण्याची इच्छा असणाऱ्या असाक्षर व्यक्ति परीक्षेपूर्वी उल्लास app वर नोंदणी करू शकतात. ही नोंदणी शाळास्तरावर केली जाते.

सदरची परीक्षा ही प्रौढांची असल्याने तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि इतर महत्वाच्या बाबींसाठी पूरक असल्याने परीक्षा केंद्रावरील वातावरण या परीक्षार्थीसाठी आनंदाचे व उत्साहाचे ठेवण्याची जबाबदारी क्षेत्रीय यंत्रणेतील प्रत्येक घटकाची आहे. परीक्षा केंद्रावरील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचा असाक्षरते बद्दलचा दृष्टीकोन सहानुभूतीचा व

मदतीचा असावा. म्हणजे परीक्षा शिस्तबध्द पध्दतीने घेण्यात येत असली तरी परीक्षार्थीसाठी वातावरण खेळकर असावे. जेणेकरुन परीक्षार्थीवर कसल्याही प्रकारचा ताण येणार नाही. अशा सूचना सर्व क्षेत्रीय अधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

या परीक्षेच्या माध्यमातून व्यक्तीच्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरुकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण ही जीवनकौशल्ये विकसित होतील. तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल. तसेच दैनंदिन जीवन जगत असताना स्वतःच्या कुटुंबात/पाहुणे/नातेवाईक यांच्यामध्ये आपले कौतुक होईल. वेगवेगळ्या दुकानांमध्ये वस्तुची खरेदी करणेसाठी गेले असता फसवणूक होणार नाही. बँक/पोस्ट ऑफिस इ. ठिकाणी आर्थिक व्यवहारामध्ये फसवणूक होणार नाही.

असाक्षर व्यक्तींनी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर रविवार दि. २३/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत स्वतः चे ओळखपत्रासह परीक्षेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सर्व परीक्षार्थीना परीक्षेसाठी शुभेच्छा...